# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०७ - २३ दिनांक : - ११/०९/२०२३

## जबरीने सोनसाखळी चोरणाऱ्या दोन आरोपीतांना २४ तासात अटक करुन दोन गुन्हयांची उकल, पेल्हार पोलीस ठाणेची कामगिरी

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०३/०९/२०२३ रोजी १८.०० वा जे दरम्यान फिर्यादी सौ. दर्शना दत्ताराम खाडे वय-४४ वर्ष रा.रुम नं-२०३, मंगलमुर्ती बिल्डिंग नं-१५, तुंगार फाटा, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर या मुंबई अहमदाबाद महामार्ग रोड क्र-८,बर्मासेल पेट्रोलपंप जवळ, सर्व्हिस रोड ने चालत घरी जात असताना मोटार सायकल वरुन आलेले अज्ञात आरोपीतांनी फिर्यादींचे पाठीमागुन येवुन गळयातील ६५,०००/- रु कि चे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने खेचुन पळुन जावुन चोरी केले बाबत फिर्यादी वरुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं- ८१४/२०२३ भा.द.वि. स कलम ३९२,३४ प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

दिनांक २९/०८/२०२३ रोजी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत अशाच प्रकारचा गुन्हा घडलेला असल्याने सदर दोन्ही गुन्हे हे एकाच आरोपीत यांनी केल्याचा संशय असल्याने पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्दे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांना सदर चैन जबरी चोरी करणा-या आरोपीताचा छडा लावुन जेरबंद करण्याच्या अनुषंगाने आदेश दिले होते.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन गुन्हयाचे घटनास्थळावरील पुराव्याचे बारकाईने परीक्षण करुन सदर गुन्हयाच्या तपास कौशल्यावरुन आरोपीतांनी गुन्हयात वापरलेल्या बुलेटचा क्रमांक प्राप्त करुन सदर बुलेटच्या मालकाचाच्या मार्फतीने गुन्हयातील मुळ आरोपीत यांचा मुलुड, कुर्ला असा माग काढुन आरोपीत नामे १) भरत मोहनलाल पुरोहित वय-३६ वर्ष रा. रा.शॉप नं-०२,गजानन निवास,हॉलीक्रॉस शाळे समोर ,कुमारखंड पाडा डोंबीवली प.जि.ठाणे मुळ-ग्राम- अनोपुरा पोस्ट- चंदेशरा, थाना-दबोक ता.मावली जि.उदयपुर राज्य- राजस्थान २) महेश भवरलाल भावत वय-३० वर्ष रा.शॉप नं-०२,गजानन निवास,हॉलीक्रॉस शाळे समोर ,कुमारखंड पाडा डोंबीवली प.जि.ठाणे मुळ- ग्राम-चंदेशरा थाना-दबोक ता.मावली जि.उदयपुर राज्य- राजस्थान यांना डोंबिवली येथुन दिनांक ०६/०९/२०२३ रोजी सदर गुन्हयात ताब्यात घेवुन त्याचे कडुन ६०,०००/- रु कि.चे एक सोन्याचे मंगळसुत्र व गुन्हा करण्याकरीता वापरलेली १,००,०००/- रुपये किंमतीची बुलेट असा एकुण १,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीतांकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

१) पेल्हार पोलीस ठाणे गुरनं-८१४/२०२३ भादविस क ३९२,३४

२) वालीव पोलीस ठाणे गुरनं-७२८/२०२३ भादविस क ३९२,३४

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.वसंत लब्दे, वरिष्ठ

पोलीस निरीक्षक सा़ो, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, तपासीक अधिकार पोउपनि. तुकाराम भोपळे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील  पोहवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोअं. संजय मासाळ, रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखिल मंडलिक, अनिल साबळे, दिलदार शेख, सुजय पाटील, सर्व नेम पेल्हार पोलीस ठाणे तसेच पोहवा. नामदेव ढोणे, पोअं. सोहेल शेख ,नेम-पोलीस उपायुक्त कार्यालय, परिमंडळ-३ विरार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

